बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि २९ ऑगस्ट २०२४**

---

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४८१/२०२४ भा न्या सं क ११८(१),११५,३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १७/०८/२०२४ रोजी ११.३० वा. चे सुमारास भिमदर्शन चौक भवानी पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २८/०८/२०२४ रोजी १४.५९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संतोष निवृत्ती सोनवणे,वय-३८ वर्षे,रा- रमाबाई आंबेडकर झोपडपट्टी न्यु बुधवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अरूणा (सासू),२) मंगल जगताप (चुलत सासू) ३) सुर्वणा सोनवणे (पत्नी) ४) विशाल कांबळे (चूलत मेव्हणा) सर्व रा- भिमदर्शन चौक भवानी पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हा सासरवाडी कडे पत्नीकडे गेले असता यातील वरील आरोपीत क्र १ हीने घरातील चटणी फिर्यादीच्या अंगावर फेकून आरोपी क्र १ ते ४ यांनी फिर्यादीस हाताने व लाथाबुक्यांने मारहाण करून आरोपी क्र १ हिने तेथेच पडलेली लाकडी काठी ने हातात घेवून फिर्यादीस सर्व अंगास मारहाण केली आहे.म्हणून. तपास:- सफौ ओव्हळ-**९२८४६४९१७८** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३८७/२०२४ भा न्या सं क १९४(४) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २८/०८/२०२४ रोजी विजापूर नाका पो.स्टे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २८/८/२०२४ रोजी १३.१० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोना/१७७० वामन शेळके नेम- विजापूर नाका पो.स्टे सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १.तेजस्वीनी रणजित माळी,वय-३५ वर्षे,रा- २०८ कल्याण नगर भाग-२ जुळे सोलापूर,२) वैष्णवी शिवशरण धुमाळ,वय-२१ वर्षे,रा- स्वागत नगर कुमठा नाका सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी,यातील नमुद आरोपीत यांना शगुप्ता दालचावल येथून पोलीस ठाणे येथे तक्रार देणेकरीता घेवून आले असता त्या दोघी पुन्हा एकमेकीवर आरोपी प्रत्यारोप करून एकमेकीच्या अंगावर जाऊन झुंज करून जोरजोराने आरडा ओरडा करत शिवीगाळ व हाताने चापटा मारून नमुद ठिकाणी गोंधळ घालून सार्व शांततेचा भंग केला आहे.म्हणून. तपास:- सफौ मोतेकर- |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६८४/२०२४ भा न्या सं क ११८(२),११८(१),११५(२),१०९,११४,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २३/०८/२०२४ रोजी रात्री ००.३० वा चे सुमारास सालार लाकूड अड्डयाजवळ,शास्त्रीनगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २९/०८/२०२४ रोजी ०१.२८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उमेश जयसिंग मन्सावाले,वय-३२ वर्षे,रा- घरनं २२० स्लॅटर हाऊस काळभैरव मठाजवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सविता २) अंबादास ३) प्रभाकर नरसिंग चन्नापागुल रा- बापूज नगर सोलापूर ४) अनोळखी इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे रा माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २३/०८/२०२४ रोजी रात्री ००.३० वा चे सुमारास सालार लाकूड अड्डयाजवळ,शास्त्रीनगर येथून फिर्यादी हा काम संपवून घरी निघाला असताना यातील आरोपी क्र १ हिने घराचे समोरून जात असताना फिर्यादीस तु माझे दारू धंदयावर दारू प्यायला का येत नाही तु आता दुसरीकडे जावून दारू पितो का असे मला विचारत होती तेव्ही मी तिला ३ महिन्यापासून दारू प्यायचे सोडून दिले आहे आता मी दारू पित नाही असे सांगितले तेव्हा फिर्यादी आरोपी क्र १ हिस बोलून घराकडे जात असताना वरील ठिकाणी आल्यावर यातील वरील आरोपीत हे दारू धंदयाच्या दुकानातून येवून फिर्यादीस काही एक न बोलता मारायला सुरू केले तेव्हा अनोळखी इसमांनी हातात विटा घेवून फिर्यादीच्या डोकीत मारून डोकीस जबर मार लागून रक्तस्त्राव होवू लागला अनोळखी इसमापैकी एकाने पॅन्टीच्या खिश्यातून फायटर काढून फिर्यादीचे तोंडावर,नाकावर,डावे डोळयाचे खालच्या बाजूस,उजवे डोळयाचे खालच्या बाजूस,गालावर,कपाळावर मारले त्यात फिर्यादीस जबर मार लागून रक्तस्त्राव होवू लागला. तसेच आरोपी क्र १ हिचे सांगण्यावरून वरील आरोपीतांनी लाथाने पोटात ,छातीवर सर्व अंगास मारून दुखापत केली आहे.फिर्यादीस जबर मार लागल्याने फिर्यादी गंभीर जखमी झाला आहे.सिव्हील हॉस्पीटलमध्ये औषधोपचार करताना डॉक्टरनी उजवे व डावे डोळयाचे खालचे बाजूस,नाकास,दाताचे वरची कवळीला जबर मार लागून फ्रॅक्चर झाले असल्याचे सांगितले म्हणून. तपासः- पोसई साखरे- **९८३४१८३१२५** |